# ‘मुंबई सेंट्रल पब्लिक पार्क’च्या विकास प्रकल्पाला मुख्यमंत्र्यांचा ग्रीन सिग्नल

प्रकल्पासाठी १२० एकरचा भूखंड महापालिकेच्या ताब्यात

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई किनारी रस्ता व महालक्ष्मी रेसकोर्स मिळून ३०० एकरांवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘मुंबई सेंट्रल पब्लिक पार्क’ विकसित करण्याचा प्रकल्प प्रत्यक्षात अवतरणार आहे. यासाठी महालक्ष्मी रेसकोर्सवरील सुमारे १२० एकर क्षेत्र आणि मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील सुमारे १७५ एकर क्षेत्र असे संपूर्ण मिळून जवळपास ३०० एकर क्षेत्राचा समावेश आहे. न्यूयॉर्क, लंडन या शहरांच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘मुंबई सेंट्रल पब्लिक पार्क’ विकसित करण्यात येईल. महालक्ष्मी रेसकोर्स भूखंडावरील एकूण २११ एकरपैकी सुमारे ९१ एकर भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने ‘मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड’ यांना देण्याच्या करारावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीत मंगळवार, दि. २ जुलै रोजी स्वाक्षरी करण्यात



आली. परिणामी, १२० एकर जागा मुंबई महापालिकेला प्राप्त झाली आहे.

महालक्ष्मी रेसकोर्स येथील २११ एकर क्षेत्राचा भूखंड हा मागील १०० वर्षांपासून अधिक काळ ‘मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड’ यांना मक्ता कराराने देण्यात आला होता. या जागेचा भाडेपट्टा करार काही वर्षांपूर्वी संपल्यानंतर हा भूखंड व्यापक नागरी हिताच्या दृष्टीने पुन्हा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते. यासाठी विविध कायदेशीर बाबी, वैधानिक आव्हाने आणि प्रशासकीय अडचणी यातून सर्वमान्य होईल, असा मार्ग काढणे ही सर्वात आव्हानात्मक बाब होती. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव तथा तत्कालिन महापालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, विद्यमान महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी तसेच उपआयुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड व मालमत्ता विभागाने या विषयाचा अत्यंत सखोल अभ्यास आणि पाठपुरावा करुन सर्वमान्य तोडगा काढण्यात यश मिळविले आहे. दरम्यान, या जागेवर कोणत्याही स्वरुपाचे व्यावसायिक, व्यापारी बांधकाम करण्यात येऊ नये. या जागेचा वापर सार्वजनिक वापराकरिता, आंतरराष्ट्रीय दर्जाचे सेंट्रल पब्लिक पार्क विकसित करण्याकरिता करण्यात यावा, असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिले आहेत.

महालक्ष्मी रेसकोर्स भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतर एकूण भूखंडापैकी १२० एकर भूखंड शासनाच्या माध्यमातून महापालिकेच्या ताब्यात देण्यास महाराष्ट्र शासनाने अलीकडे मान्यता दिली. तर उर्वरित ९१ एकर भूखंड ‘मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड’ यांना भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. हा भाडेपट्टा करार दि. १ जून २०२३ पासून ते दि. ३१ मे २०५३ या ३० वर्षांच्या कालावधीसाठी आहे. या कराराप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपआयुक्त (सुधार) संजोग कबरे, उपायुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड, सहायक आयुक्त (मालमत्ता) विनायक विसपुते आदींसह ‘मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड’ यांच्या वतीने के. एन. धुंजीभॉय, डॉ. राम श्रॉफ, दिलीप ठक्कर, सचिव निरंजन सिंग हे उपस्थित होते.

### ‘मुंबई सेंट्रल पब्लिक पार्क’चे महत्त्व

- मुंबईची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होणार.
- मुंबईत अस्तित्त्वात असलेले ३ हजार ९१७ एकर हरित क्षेत्र वाढून आता ४ हजार २१२ एकर होणार.
- मुंबईच्या पर्यावरण संरक्षण व संवर्धनात मोलाचे योगदान ठरेल.
- सर्वसामान्य मुंबईकर पर्यटकांना यापूर्वी सहज उपलब्ध न झालेल्या सुविधांचा लाभ मिळणार.

# रेल्वे स्थानकांबाहेरील अनधिकृत फेरीवाले महापालिकेच्या रडारवर

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई महानगरातील अनधिकृत फेरीवाल्यांचे निष्कासन करण्याची कारवाई महापालिकेकडून तीव्र करण्यात आली आहे. मुंबईतील विविध रेल्वे स्थानकांबाहेरील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करून पदपथ आणि रस्ते मोकळे करण्यात आले आहेत. विशेषतः अत्यंत वर्दळीच्या रस्त्यांवर आणि अधिक गर्दीच्या रेल्वे स्थानक परिसरांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करून अनधिकृत फेरीवाले हटवण्यात आले आहेत. मंगळवार, दि. २ जुलै रोजी महापालिकेने पूर्व उपनगरे विभागात कुर्ला रेल्वे स्थानक, घाटकोपर रेल्वे स्थानक, लोकमान्य टिळक मार्ग, लालबहादूर शास्त्री मार्ग इत्यादी ठिकाणी कारवाई केली.

आतापर्यंत मुंबईतील शहर विभागात उच्च न्यायालय मार्ग (फोर्ट), लिओपोल्ड कॅफे मार्ग (कुलाबा), भुयारी मार्ग (कुलाबा), चर्चगेट भुयारी मार्ग, भुयारी मार्ग (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) या प्रमुख रस्त्यांसह दादर रेल्वे स्थानक (पूर्व), दादर रेल्वे स्थानक (पश्चिम), दादाभाई नौरोजी मार्ग (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.

तसेच पश्चिम उपनगरे विभागात मथुरादास मार्ग (कांदिवली पश्चिम), भरूचा मार्ग (अंधेरी पश्चिम), स्वामी विवेकानंद मार्ग (बोरिवली), अंधेरी रेल्वे स्थानक (पूर्व), अंधेरी रेल्वे स्थानक



(पश्चिम), मालाड रेल्वे स्थानक (पूर्व), बोरिवली रेल्वे स्थानक (पश्चिम), दहिसर रेल्वे स्थानक इत्यादी ठिकाणी मंगळवारी कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, दादर (पश्चिम) रेल्वे स्थानक परिसरात सोमवार, दि. १ जुलै रोजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. तसेच अनधिकृत फेरीवाल्यांवरील निष्कासनाची कारवाई सुरु ठेवावी, विजेच्या अनधिकृत जोडण्या आढळून येताच त्या तातडीने खंडित कराव्यात, रेल्वे स्थानक परिसरातील कचरा निर्मूलन प्रभावीपणे करून परिसर स्वच्छ ठेवावा, इत्यादी निर्देश देत त्यावर विशेष लक्ष ठेवण्याची सूचना त्यांनी केली. तरी गेल्या चार ते पाच दिवसांत ५३८ हून अधिक अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

# मुंबईतील सिमेंट कॉँक्रिटच्या रस्त्यांची ‘कोअर टेस्ट’ होणार

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई महानगरात सिमेंट कॉँक्रिटच्या रस्त्यांची कामे वेगाने सुरू आहेत. मुंबईतील नागरिकांना खड्डेमुक्त रस्त्यावरून प्रवास करता यावा, यासाठी महापालिकेने सिमेंट कॉँक्रिटच्या रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत. या कामांमध्ये गुणवत्ता आणण्यासाठी प्रत्येक रस्त्याच्या कामाची ‘कोअर टेस्ट’ (सामर्थ्य चाचणी) केली जाणार असल्याची माहिती महापालिकेने दिली. मुंबई उपनगरांत दोन ठिकाणी सोमवार, दि. १ जुलैला या चाचणीला सुरूवात झाली. महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार ही चाचणी केली जात आहे.

दरम्यान, पश्चिम उपनगरांत अंधेरी पूर्वमध्ये मांजरेकरवाडी मार्ग आणि विलेपार्ले येथे दीक्षित मार्ग या दोन ठिकाणी रस्ते विभागाकडून सामर्थ्य चाचणी करण्यात आली. या चाचणीसाठी महापालिका अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर चाचणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित होते. यावेळी संयंत्राचा वापर करून सिमेंट कॉँक्रिटच्या रस्त्याचा वर्तुळाकार पद्धतीने भाग कापण्यात आला.



हा भाग नमुना म्हणून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर हे नमुने पुढील सामर्थ्य तपासणीसाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबई येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आला.

मुंबईत महापालिकेने पहिल्या टप्प्याअंतर्गत एकूण ३२४ किलोमीटरच्या रस्त्यांची सिमेंट कॉँक्रिटीकरण कामे हाती घेतली आहेत. त्यापैकी २९.३७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण झाले आहे. दरम्यान, दुसऱ्या टप्प्याअंतर्गत नियोजित सिमेंट कॉँक्रिट रस्त्यांच्या कामाची निविदा प्रक्रिया सध्या प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पासाठी ‘आयआयटी’ मुंबईमधील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील तज्ज्ञ महापालिकेच्या अभियंत्यांना मार्गदर्शन करत आहेत.

### सामर्थ्य चाचणी म्हणजे काय?

सामर्थ्य चाचणी (कोअर टेस्टिंग मशीन) संयंत्राचा वापर करून सिमेंट कॉँक्रिटच्या रस्त्याचा भाग वर्तुळाकार पद्धतीने कापण्यात येतो. हा भाग नमुना म्हणून पुढील तपासणीसाठी ‘आयआयटी’ मुंबई येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात येतो. ज्यानंतर त्या कॉँक्रिटच्या भागाची सामर्थ्य चाचणी करून त्यात वापरण्यात आलेल्या साधनसामग्रीचे गुणोत्तर, टिकाऊपणा, एकजिनसीपणा, भारवहन याअनुषंगाने विविध परिमाणांच्या निकषांवर सामर्थ्य चाचणी केली जाते. यामुळे फक्त गुणवत्तापूर्ण सिमेंट कॉँक्रिटचे रस्तेच अस्तित्त्वात येणार नाहीत, तर रस्त्यांचा दर्जा सर्वोत्कृष्ट राहील, हे रस्ते विभागाकडून सुनिश्चित करण्यात येत आहे. ज्यामुळे कमी दर्जाचे काम केलेले चालणार नाही हा संदेशही कंत्राटदारांमध्ये जाईल. तसेच अशा गुणवत्ता चाचण्यांमुळे कामांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असा विश्वास अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी व्यक्त केला.

# मुंबईत पाणीकपातीचे संकट कायम

**मुंबई** : मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील साठा कमी झाल्याने मुंबईत पाणीकपात करण्यात आली होती. परंतु, जूनमध्ये पाऊस पडूनही अपेक्षित पाणीसाठा धरणात नाही. त्यामुळे मुंबईकरांना आणखी काही दिवस पाणीकपातीचा सामना करावा लागणार आहे. मुंबईत यावर्षी दोन दिवस आधी मान्सून दाखल झाला. मात्र पावसाने अद्याप जोर धरलेला नाही. तुरळक पाऊस पडत असल्याने अपेक्षित पाणीसाठा धरणात झालेला नाही. पालिकेने ७ जलाशयांच्या अहवालात सांगितल्याप्रमाणे, सध्या ७ धरणांमध्ये केवळ ८५ हजार ६०५ एमएलडी इतका पाणीसाठा असून रोज ३८०० एमएलडी पाणी मुंबईसाठी लागते.

# जनसामान्यांसाठी विनंती अर्ज समितीचे योगदान महत्त्वाचे : नीलम गोऱ्हे



**मुंबई :** ‘‘विधान परिषदेच्या सदस्यांना प्राप्त झालेल्या निवेदनाच्या माध्यमातून समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना सोडविण्याचे, जनसामान्यांना न्याय प्राप्त करून देण्याचे काम विनंतीअर्ज समितीच्या माध्यमातून अतिशय प्रभावीपणे केले जात आहे. मागील दहा वर्षांत अत्यंत महत्त्वाचे असे २० अहवाल या समितीने सादर केले असून शासनाकडून त्याची उचित दखल घेत कार्यवाही केली जात आहे,’’ अशी माहिती विधान परिषदेच्या उपसभापती तथा विधान परिषद विनंतीअर्ज समितीच्या पदसिद्ध समितीप्रमुख डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवार, दि. २ जुलै रोजी दिली.

कर्नाटक विधान परिषदेचे उपसभापती आणि विनंतीअर्ज समितीचे प्रमुख एस. के. प्राणेश यांच्या नेतृत्वाखाली समिती सदस्यांनी विधानभवन मुंबई येथे अभ्यासभेट दिली. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याशी राज्यातील समिती कामकाजाबाबतची माहिती घेत सविस्तर चर्चा केली.

‘‘प्राप्त झालेला विनंतीअर्ज हा समितीकडे सोपविण्याबाबत सभापती यांचा अधिकार, यासंदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियमात ‘२३७-अ’ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, सभापतींना कोणताही विनंतीअर्ज त्यांच्या स्वेच्छाधिकाराने निःसत्र कालावधीतदेखील विनंतीअर्ज समितीकडे तपासणीसाठी आणि अहवाल सादर करण्यासाठी आता सोपविता येणार आहे,’’ अशी माहितीही यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

डॉ. गोऱ्हे यांनी कर्नाटक विधान परिषदेचे उपसभापती एस. के. प्राणेश यांचे स्वागत केले. या समितीचे निमंत्रित सदस्य महादेव जानकर, राजेश राठोड यांनी कर्नाटकच्या या अभ्यासगटाचे सदस्य सुनील वाल्यापुरे, एस.एल. बोजे गौंडा, कुशलप्पा एम.पी., सुदाम दास, प्रदीप शेट्टर यांचे स्वागत केले. विधानमंडळ सचिव विलास आठवले, अवर सचिव सुरेश मोगल उपस्थित होता.


## मुंबई विद्यापीठ

(नॅक श्रेणी ए + +, सीजीपीए ३.६५ गुण)

**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)**

(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था - आयडॉल)

डॉ. शंकर दयाळ शर्मा भवन विद्यानगरी कलिना सांताक्रूझ (पू.) मुंबई ४०००९८

**ऑनलाईन प्रवेश**

**अधिसूचना २०२४-२०२५**

**पदवी अभ्यासक्रम**

**प्रवेशासाठी संकेतस्थळ : https://idoloa.digitaluniversity.ac/Login**

**प्रथम वर्ष : बी. ए., बी. कॉम., बी. कॉम. (अकाऊंटिंग अँड फायनान्स), बी. एससी (माहिती तंत्रज्ञान), बी. एससी. (संगणकशास्त्र)**

प्रवेशाचे वेळापत्रक: २६ जून २०२४ ते ३१ जुलै २०२४

**खालील प्रवेशाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील**

**द्वितीय व तृतीय वर्ष : बी.ए., बी.कॉम., बी.कॉम.** (अकाऊंटिंग अँड फायनान्स), **बी.एससी** (माहिती तंत्रज्ञान), **बी.एससी.** (संगणकशास्त्र)

**भाग-१ एनईपीनुसार : एम.ए.** (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी), **एम.ए.** (भूगोल), **एम.ए.** (शिक्षणशास्त्र), **एम.ए.** (मानसशास्त्र), **एम.ए.** (संज्ञापन आणि पत्रकारिता), **एम.ए.** (जनसंपर्क), **एम.कॉम.** (अॅडव्हान्स अकाऊंटन्सी), **एम.कॉम.** एम.कॉम. (बिझनेस मॅनेजमेंट), **एम.एस.सी.** (गणित), **एम.एस. सी.** (माहिती तंत्रज्ञान), **एम.एस. सी.** (संगणकशास्त्र).

**भाग-२ : एम.ए.** (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी), **एम.ए.** (भूगोल), **एम.ए.** (शिक्षणशास्त्र), **एम.ए.**(मानसशास्त्र),**एम.ए.**(संज्ञापन आणि पत्रकारिता),**एम.ए.**(जनसंपर्क),**एम.कॉम.** (अॅडव्हान्स अकाऊंटन्सी),**एम.कॉम.**(बिझनेस मॅनेजमेंट),**एम.एस.सी.**(गणित),**एम.एस.सी.**(माहिती तंत्रज्ञान), **एम.एस.सी.** (संगणकशास्त्र)

**पीजीडीएफएम (सेमिस्टर १ आणि २ )** *(या अभ्यासक्रमाला मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली आहे)



**एमएमएस आणि एमसीए (प्रथम वर्ष)**
प्रवेश परीक्षेच्या अर्जांच्या स्वीकृतीची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

**सर्व अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेशाचे तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत:**
**https://mu.ac.in/distance-open-learning**

सही/-
**डॉ. संतोष राठोड**
**प्रभारी संचालक**

दिनांक : २१ जून, २०२४
पीआरओ/सीडीओई/१/२०२४

- Email : info@idol.mu.ac.in
- facebook : https://www.facebook.com/idol.uom/,
- Twitter : @idol_uom ,
- Telegram : https://t.me/IDOL_UoM,
- FM Radio : https://play.google.com/store/apps/details?id=com.radio.must,
- Youtube : https://youtube.com/@idoluniversityofmumbai



## विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

**सीआयएन:** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालय:** रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. **दूरध्वनी:** २२८२ २७०८/६९८२९०००
**ई-मेल:** cs.vinylchemicals@pidilite.com **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

**३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, बुक क्लोझर आणि ई-मतदान यासंदर्भात माहिती**

**वार्षिक सर्वसाधारण सभा:**

समभागधारकांनी नोंद घ्यावी की, कंपनीची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **गुरूवार, ८ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी बारा वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/ अन्य दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम)** सुविधेच्या माध्यमातून, कंपनी कायदा २०१३ (द ‘अॅक्ट’) आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ यांना अनुसरून, तसेच एकत्रित वाचनासह कंपनी व्यवहार मंत्रालयाने(एमसीए) २८ डिसेंबर २०२२ ला जारी केलेले परिपत्रक तसेच सेबीने १३ मे २०२२ आणि ५ जानेवारी २०२३ ला जारी केलेली परिपत्रके आणि यासंदर्भात अन्य संबंधित परिपत्रके या सर्वांना अनुसरून ३८ व्या एजीएम (एजीएम नोटीस) आयोजनाच्या नोटीसमध्ये नमूद केलेले कामकाज पूर्ण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त परिपत्रकांचे पालन करून, आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या कंपनी वार्षिक अहवालाच्या लिंकसह एजीएम नोटीसच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, ज्या सभासदांनी आपले ई-मेल आयडी कंपनी/ रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण (आर अॅण्ड टी) प्रतिनिधी/डिपॉझिटरी पार्टिसीपंटस् (‘डीपी’) यांच्याकडे नोंदविलेले आहेत, अशा सर्व सभासदांना कंपनी पाठवणार आहे. वर नमूद केलेल्या एमसीए आणि सेबी परिपत्रकांनुसार वार्षिक अहवालाच्या छापील प्रती पाठविण्याची आवश्यकता पूर्ण करण्यात आलेली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठीच्या वार्षिक अहवालासह एजीएम नोटीसच्या छापील प्रती कंपनीच्या आर अॅण्ड टी प्रतिनिधींना त्यांच्या csg-annualreports@linkintime.co.in या ई-मेल पत्त्यावर ई-मेल पाठवून विनंती करणाऱ्या सभासदांनाच पाठविल्या जातील.

एजीएम नोटीससह आर्थिक वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com तसेच कंपनीचे समभाग सूचीबध्द असलेल्या शेअरबाजारांची संकेतस्थळे म्हणजेच बीएसई लिमिटेड (बीएसई) चे www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) चे www.nseindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेडचे (एनएसडीएल) संकेतस्थळ www.evoting.nsdl.com यावरसुध्दा उपलब्ध करुन दिला जाईल.

**मतदानाविषयी माहिती:**

एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर त्यांचे मत देता यावे, याकरिता.समभागधारकांना दूरस्थ ई-मतदान सुविधा (रिमोट ई-व्होटिंग) प्रदान करण्यात आलेली आहे.

समभागधारकांना एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदान सुविधेचा वापर करून किंवा एजीएम दरम्यान ई-मतदानाचा वापर करत मतदान करण्याचा पर्याय आहे.

(अ) एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदान, (ब) एजीएमच्या दिवशी ई-मतदान आणि (क) व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहणे यासंबंधीच्या तपशीलवार सूचना एजीएम नोटीसमध्ये नमूद केलेल्या आहेत.

समभागधारकांना याबाबत काही शंका असल्यास, ते एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेले फ्रिक्वेन्डली आस्कड् क्वेश्चन्स (एफएक्यूज) फॉर शेअरहोल्डर्स आणि ई-व्होटींग युझर मॅन्युअल फ़ॉर शेअरहोल्डर्स याचा संदर्भ घेऊ शकतात अथवा ०२२ ४८८६ ७००० या क्रमांकावर कॉल करावा अथवा आपली विनंती श्री. अमित विशाल, उपाध्यक्ष, एनएसडीएल यांना evoting@nsdl.com या ई-मेलच्या माध्यमातून पाठवू शकतात.

**ई-मेल पत्यांची नोंदणी करणे:**

छापील स्वरुपात समभाग धारण केलेले सभासद आणि ज्यांनी कंपनीसोबत आपले ईमेल पत्ते अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी कंपनीला cs.vinylchemicals@pidilite.com अथवा कंपनीचे आर अॅण्ड टी प्रतिनिधी यांना csg-unit@linkintime.co.in वर ई-मेल पाठवून त्यांचे ई-मेल पत्ते अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

डिमटेरिअलाइज्ड स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांना त्यांच्या संबंधित डीपीकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणी/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते.

**लाभांशाचे वितरण आणि बुक क्लोजर:**

समभागधारकांनी याची नोंद घ्यावी की, आगामी एजीएममध्ये समभागधारकांच्या मंजुरीच्या अधीन राहत, कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या ३ मे २०२४ रोजी झालेल्या बैठकीत ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येकी १/- रुपये दर्शनी मूल्याच्या समभागासाठी, प्रति समभाग ६.७५/- रुपये एकूण लाभांशाची शिफारस केलेली आहे. लाभांश, जर समभागधारकांनी मंजूर केला तर, ज्या समभागधारकांची नावे रेकॉर्ड तारखेनुसार, म्हणजेच, **बुधवार, २४ जुलै २०२४** पर्यंत परिस्थितीनुसार सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद झालेली असतील, अशा समभागधारकांना सोमवार १४ ऑगस्ट २०२४ रोजी किंवा नंतर दिला जाईल.

ज्या समभागधारकांनी त्यांचे बँक खाते तपशील अद्ययावत केलेले आहेत, त्यांना लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने विविध ऑनलाइन हस्तांतरण पद्धतींद्वारे दिला जाईल. जे शेअरहोल्डर्स भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करत आहेत त्यांनी हे लक्षात घ्यावे की सेबी ने १६ मार्च २०२३ च्या परिपत्रकाद्वारे अनिवार्य केले आहे की १ एप्रिल, २०२४ लाभांश केवळ त्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दिला जाईल ज्यांचे फोलिओ केवायसी अनुपालन आहेत. म्हणून, भौतिक स्वरूपात समभाग धारण केलेल्या भागधारकांना त्यांचे केवायसी तपशील अद्यतनित करण्याची विनंती केली जाते उदा. कंपनीने घोषित केलेल्या लाभांशाची पावती सुनिश्चित करण्यासाठी **२४ जुलै २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी कंपनी/आर आणि टी एजंट्सकडे पॅन, बँक तपशील आणि नामांकन तपशील.

कायद्याच्या कलम ९१ ला अनुसरून तसेच कंपनीज (मॅनेजमेंट अॅण्ड अॅडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम १० आणि लिस्टींग रेग्युलेशन्सची नियमावली ४२ यांच्या एकत्रित वाचनासह नोटीस देखील दिली जात आहे की, एजीएमसाठी त्याचबरोबर एजीएमच्या ठिकाणी सभासदांनी मंजुरी दिल्यास लाभांशाच्या वितरणासासाठी कंपनी सभासदांचे रजिस्टर आणि समभाग हस्तांतरण पुस्तिकेचे कामकाज **गुरूवार २५ जुलै २०२४ ते गुरूवार ८ ऑगस्ट २०२४** (दोन्ही दिवसांच्या समावेशासह) यादरम्यान बंद ठेवण्यात येणार आहे.

सभासद याबाबत अवगत आहेत की, वित्तीय कायदा २०२० द्वारे सुधारित करण्यात आलेल्या प्राप्तीकर कायदा १९६१ (आयटी अॅक्ट), नुसार, १ एप्रिल २०२० नंतर कंपनीने दिलेला किंवा वितरित केलेला लाभांश सभासदांना मिळताना करपात्र असेल आणि कंपनीला सदर लाभांशातून विहित दराने उदगम कर (टीडीएस) कपात करणे आवश्यक आहे. सभासदांच्या निवासी स्थितीनुसार आणि त्यांनी वेळेत सादर केलेल्या आणि कंपनीने स्वीकारलेल्या कागदपत्रांनुसार टीडीएसचे दर बदलू शकतात.

कंपनीने यासंदर्भात, कंपनी/आर अॅण्ड टी प्रतिनिधी/डिपॉझिटरीजकडे आपल्या ई-मेलची नोंदणी केलेल्या सर्व सभासदांना २८ जून २०२४ रोजी पाठविलेल्या ईमेल संप्रेषणाद्वारे समभागधारकांना दिलेल्या लाभांशावर विहीत दराने कपात केल्या जाणाऱ्या कराची आकारणी रोखण्याची प्रक्रिया आवश्यक परिशिष्टांसह स्पष्ट केलेली आहे. हे संप्रेषण कंपनीच्या www.vinylchemicals.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

**ईमेलची नोंदणी आणि बँक खाते तपशील अद्ययावत करणे:**

जे समभागधारक त्यांच्या ईमेल पत्त्याची नोंदणी करू इच्छितात आणि/किंवा लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचा तपशील अद्ययावत करू इच्छितात त्यांना खालील सूचनांचे पालन करण्याची विनंती केली जात आहे:

अ) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेल्या समभागांसाठी: डीपीने सुचविलेल्या प्रक्रियेनुसार तुमच्या डीमॅट खात्यात तपशीलांची नोंदणी करा/अद्ययावत करा.

ब) छापील स्वरूपात असलेल्या समभागांसाठी: कंपनीचे आर अॅण्ड टी प्रतिनिधी यांच्याकडे विहित फॉर्म आयएसआर-१ मध्ये तपशीलांची नोंदणी करा/अद्ययावत करा. सेबीच्या १६ मार्च २०२३ चे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी-१/पी/सीआयआर/२०२३/३७ ला अनुसरून कंपनीने छापील स्वरूपात समभाग धारण केलेल्या समभागधारकांना आणि त्यांच्या संबंधित फोलिओमध्ये नोंदणीकृत नसलेला केवायसी तपशील सादर करण्यासाठी त्यांना पत्रे पाठवलेली आहेत.

तसेच, कंपनीचे संकेतस्थळ www.vinylchemicals.com यावर उपलब्ध असलेल्या संबंधित फॉर्मचा देखील समभागधारक वापर करू शकतात.

उपरोक्त माहिती कंपनीच्या समभागधारकांच्या माहितीसाठी आणि फायद्यांसाठी जारी केली जात आहे आणि ती यासंदर्भात लागू असलेली एमसीए आणि सेबी परिपत्रक (के) यांचे पालन करते.

कोणतीही शंका असल्यास, समभागधारक कंपनीचे आर अॅण्ड टी प्रतिनिधी, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी १०१, पहिला मजला, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३, दूरध्वनी : ०२२ - ६६५६८४८४, ई-मेल: csg-unit@linkintime.co.in येथे संपर्क साधू शकतात.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडसाठी**

मुंबई
४ जुलै, २०२४

**पी.सी. पटेल**
**कंपनी सचिव**